# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ
## मुंबई — ४०० ०२०

ॲफि.जन.१ / परिपत्रक / २०२२–२३ / 1200 १६ जुलै, २०२२

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करिता अतिरिक्त तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्याबाबत

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, सर्व संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य / संचालक यांना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक शालांतर परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थीनींचा विशिष्ठ अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेता, कोणतीही विद्यार्थीनीं इच्छित उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, हे विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(८) मध्ये **असामान्य परिस्थिती विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती मान्यता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्र. एनजीसी / २०१७ / (१२८ / १७) / मशी–४ दिनांक ४ जुलै, २०१७** अन्वये ज्या अभ्यासक्रमांना शिखर परिषदेची (Apex Body) मान्यता आवश्यकता आहे असे अभ्यासक्रम **वगळून** विशिष्ट विद्याशाखांना जलदगती पध्दतीने अतिरिक्त नवीन तुकडयांना मान्यता देण्यासंदर्भात निकष व कार्यपध्दती विहित केली आहे.

त्यास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करित असल्यास शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून जलदगती पदधतीने विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त / नवीन तुकडी करिता विद्यापीठाकडे आवश्यक कागदपत्रासह दिनांक **२० जुलै, २०२२** पर्यंत **ऑनलाईन पदधतीने** अर्ज सादर करून प्रस्तावाच्या २ प्रती विद्यापीठाच्या संलग्नता विभागात दिनांक २१ जुलै, २०२२ सायंकाळी ५.०० पर्यंत सादर करावेत.

ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी लिंक https://sndtwuonline.org.in या संकेतस्थळ दिनांक १६ / ०७ / २०२२ ते २० / ०७ / २०२२ रात्री १२.०० पर्यंत उपलब्ध करून देण्यात येईल. तरी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी https://sndtwuonline.org.in या संकेत स्थळावर भेट द्यावी व आपणास प्राप्त असलेल्या महाविद्यालयाच्या लॉगीन आयडीचा वापर करावा.

सदर बाबत अधिकच्या माहितीकरिता / मार्गदर्शनासाठी ०८८२८९९६६६१ / ०८८२८९९६६६२ या भ्रमणध्वनीवर संपर्क करू शकता.

16/7/22

(डॉ. प्रज्ञा वाकपैंजण)
संलग्नता विभाग (अतिरीक्त भार)

D:\Pallavi\Affiliation (Pallavi)\CIRCULAR\Fast track division circular 2020-21.doc